# अमरावती महानगरपालिका, अमरावती
# अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र

नं. 229

कार्यालय अग्निशमन विभाग
जा.क्र. अ.म.न.पा./अशवि/133/२०19
दिनांक :- 18/12/२०19

प्रति, पुष्पश्री अपार्टमेन्ट, एम.
आय. डी. सी रोड जुना
बायपास अमरावती

संदर्भ :- (१) ना-हरकत मिळण्याकरिता आपला प्राप्त अर्ज दि. 16/12/19

(२) आइकॅस फायर इंजि. या प्राधिकृत अभिकर्ता द्वारा प्राप्त फायर सेफ्टी ऑडीट रिपोर्ट दि. 21/11/19

## ना-हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/ सौ. राम महाजन & गोविंद जोशी

यांनी संदर्भ १ चे विनंती अर्जानुसार व संदर्भ २ चे शासन प्राधिकृत अभिकर्ता / संस्थेद्वारे अग्निसुरक्षा ऑडीट करून रहिवासी इमारत या व्यवसायासाठी अग्निशमन विभाग म.न.पा. अमरावती यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे. तसेच दि. 18/12/19 ला तांत्रिक तपासणी अग्निशमन अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी केली. त्यानुसार खालील नियम वअटी शर्तीच्या आधीन राहून आपणास ना-हरकत प्रदान करण्यात येते.

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक अधिनियम २००६-०९ अन्वये आपणास आगप्रतिबंधक उपाय योजना व यंत्रणा यामधील तरतुदीची अनुपालन करण्यात यावे व NBC-२०१६ नियमांची पूर्तता करण्यात यावी तसेच राज्य शासन व अमरावती महानगर पालिकेने वेळोवेळी केलेले नियम व त्यामधील बदल आपल्यावर बंधनकारक राहील.

२) इमारतीचे Fire Safety Audit नुसार संपूर्ण अग्निसुरक्षा व्यवस्था करावी लागेल. आवश्यक त्या ठिकाणी धुम्रपान निषेध फलक लावावे व महत्वाचे दुरध्वनी क्रमांक उदा. पोलिस नियंत्रण कक्ष अग्निशमन दल, ॲम्बुलन्स इ. चा फलक दर्शनिय ठिकाणी लावावे.

३) अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण, मा. संचालक अग्निशमन सेवा, मुंबई यांनी नोंदणीकृत केलेले अनुज्ञप्तीधारक अभिकरणांकडून जानेवारी ते जुलै असे वर्षातून दोन वेळा करून घेणे बंधनकारक राहील.

४) आपल्या सर्व कर्मचारी वर्गास अग्निरोधक उपकरणाची वेळोवेळी माहिती देण्यात यावी व सराव घेण्यात यावा.

५) आगप्रतिबंधक उपाय योजना नेहमीसाठी कार्यान्वित रहावी याची दक्षता घ्यावी सर्व विद्युत उपकरणे खात्रीच्या अभिकर्त्याकडून तपासुण घ्यावेत.

६) आगप्रतिबंधक उपाययोजना बाबत लावलेल्या अग्निशमन उपकरणाची पाहणी अग्निशमक दल मार्फत केव्हाही करण्यात येईल. अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र सोबत इतर विभागाचे आवश्यक ते परवाने घ्यावे.

७) नाहरकत प्रमाणपत्राची वैधता १ वर्षाची राहील.

८) वरील प्रमाणे व्यवस्थे अभावी आगीची कोणतीही घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी व्यवस्थापनाची (अर्जदार) राहील.

९) दरवर्षी नुतनीकरण शुल्क भरून अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

१०) सदर आधिनियमाच्या किंवा त्यासाठी केलेल्या नियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या उलंघणाचा या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाची किंवा कोणत्याही नोटीसीच्या किंवा कोणत्याही निर्देशाच्या आवश्यकतेनुसार अनुपालन करण्यात कसुर केल्यास संबंधित प्रकरणी कलम ७,८,३६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

११) वरील बाबींची पूर्तता न झाल्यास आपले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल व याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहील.

उपरोक्त प्रमाणपत्र हे दि. 17/12/2020 पर्यंत वैध राहील.

टिप :- १) अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण दरवर्षी करणे अनिवार्य आहे.
२) शासन नियमानुसार फॉर्म बी दर सहा महिन्याने सादर करणे अनिवार्य आहे.

18.12.19

आयुक्त / उपायुक्त / अग्नि. अधिक्षक
अमरावती महानगरपालिका, अमरावती.